दै. पुण्यनगरी दि. 19/05/2024

# अल्पवयीन बालकाकडून चोरीच्या दोन व एक बेवारस दुचाकी जप्त

## वजीराबाद गुन्हे शोध पथकाची कामगिरी

**नांदेड/प्रतिनिधी**

वजिराबाद गुन्हे शोध पथकाने एका अल्पवयीन बालकाकडून चोरीच्या २ दुचाकी जप्त केल्या. त्यासोबत १ बेवारस दुचाकी जप्त केली आहे. या पथकाने त्याच्याकडून २ लाख ३० हजार रुपयांच्या तीन दुचाकी जप्त केल्या आहेत. दि. १६ मे रोजी ही कारवाई करण्यात आली.



पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, सहाय्यक पोलीस अधीक्षक एस.एस.किरीतीका यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्वाधीन अधिकारी व गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना जास्तीत जास्त चोरीच्या दुचाकीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते.

या अनुषंगाने वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबादच्या गुन्हे शोध पथकाने सखोल तपास केला. त्यांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी दुचाकी चोरींच्या घटनास्थळाला भेट देऊन तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. दि.१६ मे रोजी सपोनि आर.डी. वटाणे, जमादार शरद सोनटक्के, माधव नागरगोजे, पोकॉ बालाजी कदम, पोकॉ शेख ईम्रान, पोकॉ रमेश सूर्यवंशी, पोकॉ भाऊसाहेब राठोड, पोकॉ अंकुश पवार, पोकॉ मेघराज पुरी यांचा समावेश असलेल्या पथकाने मोटरसायकल चोरट्यांचा शोध घेत असतांना छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक अल्पवयीन बालक आपल्या ताब्यात विना क्रमांकाची मोटारसायकल घेऊन जात असतांना आढळुन आल्याने त्याला थांबवून पोलिसांनी चौकशी केली. त्याच्या जवळची मोटारसायकल चोरीची असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. त्यावरुन पोलिसांनी त्याला अधिक विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने अन्य एक चोरीची मोटारसायकल काढुन दिली. या प्रकरणी वजिराबाद पोलीसांनी गु.र.न. १०९/२४ व २१०/२४ नुसार भादंविच्या ३७९ कलमान्वये गुन्हे दाखल आहेत.

या दुचाकी चोरट्यांचा शोध घेत असतांना तिरंगा चौकातील शौच्चालयाच्या बाजुला एक युनीकॉर्न कंपनीची बेवारस मोटारसायकल मिळाली. त्याबाबत खात्री केली असता ती नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.न. ३१६/२४ कलम ३७९ भारतीय दंड विधान या गुन्ह्यातील असल्याची खात्री झाल्याने सदर **(पान ४ वर..)**